जिल्हाधिकारी कार्यालय जालना.

## जिल्हाधिकारी कार्यालय जालना

### विधी अधिकारी पद कंत्राटी पध्दतीने भरणे साठी जाहीरात

### जाहीरात क्रमांकः- 2014/आस्था-1/प्र.क्र.51(1)/2011

जिल्हाधिकारी कार्यालय व अधिनस्तच्या कार्यालयातील न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडणे व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीणे निपटारा होण्याचे दृष्टीने विधी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने भरावयाचे आहे. त्यादृष्टीने परिशिष्ट-अ अंतर्गतची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडण्यास तयार असलेल्या व निम्नदर्शित शैक्षणीक अर्हता/अनूभव धारण करीत असलेलया पात्र विधीज्ञांकडून दिनांक 30/10/2014 पावेतो कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**01. पदाचे नावः-** कंत्राटी विधी अधिकारी

**02. पदसंख्याः-** 01

**03. मानधनः-** एकत्रीत मानधन रू.20,000 + 5000 दूरध्वणी व प्रवासखर्च, याव्यतीरीक्त कोणतेही भत्ते अनूज्ञेय होणार नाहीत.

**04. शैक्षणिक अर्हता व अनूभव**

4.1 शैक्षणिक अर्हताः उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदविधर (एलएलबी) व सनदधारक असेल.

4.2 अन्य अर्हताः
1. उमेदवार महसूल विषयक, सेवा विषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थीती तथा विभागीय चौकश्या इत्यादी बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामूळे कायदे विषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
2. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांचे पूरेसे ज्ञान असावे.

4.3 अनूभवः विधी अधिकारी पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान 7 वर्षाचा अनूभव आवश्यक राहील.

05. वयोमर्यादाः- विधी अधिकारी पदासाठी उमेदवाराचे नियूक्तीच्या वेळी वय 45 वर्षे पेक्षा जास्त नसावे.

06. कराराचा कालावधीः- 11 महिने

कंत्राटी विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदा-या विषयक परिशिष्ट-अ, अर्जा समवेत जाडावयाची कागदपत्रे व अटी/शर्ती तसेच विहीत नमून्यातील अर्ज इत्यादीसाठी आस्थापना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा किंवा या कार्यालयाच्या **www.Jalna.nic.in** या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) या बाबी उपलब्ध आहेत.

इच्छूक उमेदवारांनी त्यांचे विहीत नमून्यातील अर्ज जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जालना या नावाने दिनांक 30/10/2014 पूर्वी कार्यालयीन वेळेत समक्ष/पोष्टाव्दारे आस्थापना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

दिनांकः- 17/10/2014
ठिकाणः- जालना

स्वाक्षरीत/-
(ए.एस.आर.नायक)
जिल्हाधिकारी जालना

# परिशिष्ट-अ

कंत्राटी पध्दतीने नेमणूक करावयाच्या विधी अधिकारी या पदांची कर्तव्ये/जवाबदा-या तसेच पदावरील नियुक्ती साठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनूभव पुढील प्रमाणे आहे :

## कंत्राटी विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जवाबदा-या :

01 कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीं बाबत/ न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे,

02 महसूल विषयक / परिच्छेदनिहाय अभिप्राय (**Parawise comments**) तयार करणे/सेवा विषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी इत्यादि तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे,

03 प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिला कडे पाठपूरावा करणे, जेथे शासन/जिल्हाधिकारी/महसूल अधिकारी प्रतिवादी आहे अशा प्रकरणी करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे,

04 शपथपत्राचा मसूदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेवून न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे,

05 जेथे शासन/जिल्हाधिकारी/महसूल अधिकारी यांचे विरोधात निकाल होईल अशा प्रकरणां मध्ये न्यायालयीन निर्णयाचा अभ्यास करुन तद्नूषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे,

06 अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसूदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागे पर्यंत पाठपूरावा करणे,

07 विधी विषयक कामकाजा बाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे

## कंत्राटी विधी अधिकारी पदा साठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनूभव :

01 उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल

02 विधी अधिकारी पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान 7 वर्षांचा अनूभव आवश्यक राहील,

03 उमेदवार महसूल विषयक, सेवा विषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकश्या इत्यादि बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदे विषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल,

04 उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पूरेसे ज्ञान असावे,

05 विधी अधिकारी पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी 45 वर्षापेक्षा जास्त नसावे.

# कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी पदावर नियुक्ती
## अर्जा समवेत जोडावयाची कागदपत्रे

01 जन्मदिनांक/वयाचे पृष्ठयार्थ शाळा सोडल्याचा दाखला

02 शैक्षणिक अर्हते बाबतच्या प्रमाणपत्र/सनदच्या प्रती

03 वकिली व्यवसायाचा 7 वर्षे अनूभवाचे प्रमाणपत्र

04 दोन वरिष्ठ विधीज्ञां कडील चारित्र्य प्रमाणपत्र

05 अर्जदाराचे नजीकच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र

06 अनूभवाचे प्रमाणपत्र

**अटी/शर्ती :**

01 सदर पदाची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल. हे विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाहीत,

02 सदर नेमणूक ही करार पध्दतीने प्रथमतः 11 महिन्यांसाठी करण्यात येईल,

03 करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या विधी अधिकारी यांना एकत्रित मानधन व अनूज्ञेय दूरध्वनी/प्रवासखर्चा व्यवतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनूज्ञेय होणार नाहीत,

04 अंतिम निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याहि स्तरावर रद्य करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांचे राहतील. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती देणे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

05 अंतिम निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती द्यावयाची झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे देण्यात येईल. तसेच अशा उमेदवारास नियुक्ती आदेश मिळाले पासून 7 दिवसांचे आत नियुक्तीचे ठिकाणी स्वखर्चाने रुजू होणे अनिवार्य राहील. अन्यथा नियुक्ती आपोआप रद्य ठरेल

06 अंतिम निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीपूर्वी शासन निर्णय 30.07.2011 समवेतचे परिशिष्ट-ब मध्ये नियुक्तीपूर्वी करारनामा करुन देणे बंधनकारक असेल

# कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी पदावर नियुक्ती साठी अर्ज

## जिल्हा जालना

फेर जाहिरात क्रमांक : आस्था-1/प्रक्र-51(1)/2011

नजीकच्या काळातील पासपोर्ट
आकाराचे छायाचित्र

प्रती,
मा.जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
जालना

01 अर्जदाराचे संपूर्ण नांव (आडनाव, नांव व वडिलांचे नांव) :----------------------------------------
----------------------------------------

02 पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------

दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :----------------------------------------

03 जन्मदिनांक :----------------------------------------

04 जन्माचे ठिकाण :----------------------------------------

05 महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय: होय / नाही

06 महाराष्ट्र व गोवा बार कौन्सीलचे सदस्य म्हणून नोंदणी केली असल्याचा नोंदणी क्रमांक व दिनांक :

07 शैक्षणिक पात्रता (एस.एस.सी/एचएससी पासून पुढील) :

| परीक्षेचे नांव | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | विषय | उत्तीर्ण वर्ष | सरासरी गुण/ वर्गवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |

08 विधीज्ञ कामाचा अनूभव :

| कोणकोणत्या न्यायालयात विधीज्ञाचे काम केले | दिवाणी व फौजदारी कितीकिती प्रकरणे हाताळली | सेवा विषयक बाबींची किती प्रकरणे हाताळली | म.ज.म.अ. 1966 अंतर्गतची,ग्रामपंचायत अधिनियमांतर्गतची, जिवनावश्यक वस्तू कायदा, भूसंपादन कायदा व प्रशासनिक स्वरुपाची किंती किती प्रकरणे हाताळली |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | | | |

09 यापूर्वी करार पध्दतीने कामकाज केले असल्यास त्याबाबतच्या अनूभवाचा तपशिल :

| धारण केलेले पद | पदावर रुजू दिनांक | पद सोडल्याचा दिनांक | पद सोडण्याची कारणे |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |

10 ज्ञात असलेल्या भाषा :

वाचणे : -------------- --------------- --------------

लिहीणे : -------------- --------------- --------------

बोलणे : -------------- --------------- --------------

11 फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल असल्यास त्याबाबतचा तपशिल व सद्यस्थिती : ----------------------------------

----------------------------------

----------------------------------

अर्जांतर्गत नमूद करण्यात आलेली माहीती खरी व सत्य असून खोटी आढळल्यास माझी नेमणूक आपोआप रद्य होणेस व कायदेशिर कारवाईस पात्र राहीन.

दिनांक :

ठिकाण :

स्वाक्षरी

अर्जदाराचे नांव :